दिनांक 12/02/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 235

विषय – विटा नगरपरिषदेसाठी स्वच्छ सर्वेक्षण व माझी वसुंधरा अभियानकामी नाविण्यपुर्ण उपक्रम म्हणून Reverse Bottle Vending Machine बसविणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी विभाग प्रमुख यांची दिनांक 09/02/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा शहराने मागील 6-7 वर्षामध्ये स्वच्छ सर्वेक्षणमध्ये उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे. तसेच स्वच्छ सर्वेक्षण 2021 मध्ये संपूर्ण देशामध्ये प्रथम क्रमांक व स्वच्छ सर्वेक्षण 2022 मध्ये पश्चिम भारतात दुसरा क्रमांक प्राप्त केला होता. स्वच्छ सर्वेक्षण 2023 मध्ये विटा नगरपरिषदेचा संपूर्ण देशामध्ये 7 वा क्रमांक प्राप्त केला आहे. तसेच मुख्यमंत्री सक्षम शहर स्पर्धेमध्ये पश्चिम विभागात 3 रा क्रमांक प्राप्त केला आहे.

सध्या स्वच्छ सर्वेक्षण 2024, माझी वसुंधरा अभियानाची कार्यवाही सुरू असून स्वच्छ सर्वेक्षण 2024 व माझी वसुंधरा अभियान अनुषंगिक अभ्यासक्रमाकरीता नाविण्यपुर्ण उपक्रम म्हणून Reverse Bottle Vending Machine बसविणे योग्य आहे. कचरा मुक्त शहराच्या संकल्पनेनुसार शहरातील विविध ठिकाणांचे कच-याचे ढीग GVP काढून टाकल्यानंतर तेथील जागांचे सुशोभीकरण करणे आवश्यक आहे. त्यानुसार विटा शहरातील GVP असलेल्या ठिकाणी तसेच सार्वजनिक वर्दळ असलेल्या ठिकाणी नागरीकांच्या सवयी बदलण्यास प्रोत्साहन देणेसाठी शहरात Reverse Bottle Vending Machine बसविणे आवश्यक वाटते. सदर मशीन बसविलेमुळे नागरीक रस्त्यावर किंवा इतरत्र टाकले जाणारे प्लास्टिक बॉटल इतरत्र न टाकता या मशीनमध्ये टाकतील. परिणामी एकल वापर प्लास्टिक बंदी अधिनियम व सुका कचरा व्यवस्थापन अंतर्गत यामुळे शहरातील सुशोभीकरणास मदत होईल व याचा फायदा स्वच्छ सर्वेक्षण 2024 व माझी वसुंधरा अभियानामध्ये होईल.

तरी विटा नगरपरिषदेसाठी स्वच्छ सर्वेक्षण व माझी वसुंधरा अभियानकामी नाविण्यपुर्ण उपक्रम म्हणून Reverse Bottle Vending Machine बसविणेस मंजूरी देत आहे. सदरचे काम स्वच्छ सर्वेक्षणमध्ये उच्चतम कामगिरी करणाऱ्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना देण्यात येणाऱ्या प्रोत्साहनात्मक बक्षीस रक्कम अंतर्गत करणेत यावे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 12/02/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.236

विषय – विटा नगरपरिषदेसाठी स्वच्छ सर्वेक्षण व कचरा मुक्त शहराच्या तारांकित मानांकनाच्या अनुषंगाने ICT Enable Digital Cleaning Monitoring सिस्टीम बसविणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी विभाग प्रमुख यांची दिनांक 09/02/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा शहराने मागील 6-7 वर्षामध्ये स्वच्छ सर्वेक्षणमध्ये उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे. तसेच स्वच्छ सर्वेक्षण 2021 मध्ये संपूर्ण देशामध्ये प्रथम क्रमांक व स्वच्छ सर्वेक्षण 2022 मध्ये पश्चिम भारतात दुसरा क्रमांक प्राप्त केला होता. स्वच्छ सर्वेक्षण 2023 मध्ये विटा नगरपरिषदेचा संपूर्ण देशामध्ये 7 वा क्रमांक प्राप्त केला आहे. तसेच मुख्यमंत्री सक्षम शहर स्पर्धेमध्ये पश्चिम विभागात 3 रा क्रमांक प्राप्त केला आहे.

सध्या स्वच्छ सर्वेक्षण 2024, माझी वसुंधरा अभियान 4.0 सुरू असून विटा नगरपरिषदेसाठी स्वच्छ सर्वेक्षण व कचरा मुक्त शहराच्या तारांकित मानांकनाच्या अनुषंगाने ICT Enable Digital Cleaning Monitoring सिस्टीम बसविल्यास शहरातील रस्ते सफाई, गटर सफाई व शौचालय सफाई यांच्यावर देखरेख ठेवणे व Digitally Track करणे सोपे होणार आहे. याचा फायदा स्वच्छ सर्वेक्षण 2024 मध्ये गुणांकन वाढविणेकरीता होणार आहे.

तरी विटा नगरपरिषदेसाठी स्वच्छ सर्वेक्षण व कचरा मुक्त शहराच्या तारांकित मानांकनाच्या अनुषंगाने ICT Enable Digital Cleaning Monitoring सिस्टीम बसविणेस मंजूरी देत आहे. सदरचे काम स्वच्छ सर्वेक्षणमध्ये उच्चतम कामगिरी करणाऱ्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना देण्यात येणाऱ्या प्रोत्साहनात्मक बक्षीस रक्कम अंतर्गत करणेत यावे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 12/02/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.237

विषय – विटा नगरपरिषदेसाठी स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत Innovation and Best Practices विषयक नाविण्यपुर्ण उपक्रम म्हणून Solar Enabled Oxygen Tree बसविणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी विभाग प्रमुख यांची दिनांक 09/02/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा शहराने मागील 6-7 वर्षामध्ये स्वच्छ सर्वेक्षणमध्ये उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे. तसेच स्वच्छ सर्वेक्षण 2021 मध्ये संपूर्ण देशामध्ये प्रथम क्रमांक व स्वच्छ सर्वेक्षण 2022 मध्ये पश्चिम भारतात दुसरा क्रमांक प्राप्त केला होता. स्वच्छ सर्वेक्षण 2023 मध्ये विटा नगरपरिषदेचा संपूर्ण देशामध्ये 7 वा क्रमांक प्राप्त केला आहे. तसेच मुख्यमंत्री सक्षम शहर स्पर्धेमध्ये पश्चिम विभागात 3 रा क्रमांक प्राप्त केला आहे.

तरी शहराच्या सौंदर्यात भर घालण्यासाठी व स्वच्छ सर्वेक्षण, माझी वसुंधरा अभियानात शहराचे मानांकन उंचावण्यासाठी Innovation and Best Practices विषयक नाविण्यपुर्ण उपक्रम म्हणून Solar Enabled Oxygen Tree बसविणे योग्य वाटते. शहर हागणदारीमुक्त झाल्याने शहरातील पूर्वीच्या हागणदारीच्या ठिकाणांचे (OD Spot) तसेच सार्वजनिक वर्दळ असलेल्या ठिकाणांचे सुशोभीकरण करणे आवश्यक आहे. याठिकाणी Solar Enabled Oxygen Tree बसविलेमुळे सदर ठिकाणाचे सुशोभीकरणास मदत होईल व याचा फायदा स्वच्छ सर्वेक्षण 2024 व माझी वसुंधरा अभियानामध्ये होईल.

तरी विटा नगरपरिषदेसाठी स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत Innovation and Best Practices विषयक नाविण्यपुर्ण उपक्रम म्हणून Solar Enabled Oxygen Tree बसविणेस मंजूरी देत आहे.

सदरचे काम स्वच्छ सर्वेक्षणमध्ये उच्चतम कामगिरी करणाऱ्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना देण्यात येणाऱ्या प्रोत्साहनात्मक बक्षीस रक्कम अंतर्गत करणेत यावे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 12/02/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 238

विषय – घोगांव जॅकवेल येथे पॅनेल रूमला लागून उंचीवर ट्रान्सफार्मर ठेवणेकरिता व तदअनुषंगीक कामे करणेकरिता सिमेंट क्रॉक्रेट ब्लॉक्स (कट्टे), स्लॅब व रेलींग इत्यादी चे बांधकाम करणेकामी दाखल निविदावर निर्णय घेणे. (अं.र.रू.4,91,583/-)

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी विभाग प्रमुख यांची दिनांक 06/02/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

घोगांव जॅकवेल येथे पॅनेल रूमला लागून उंचीवर ट्रान्सफार्मर ठेवणेकरिता व तदअनुषंगीक कामे करणेकरिता सिमेंट क्रॉक्रेट ब्लॉक्स (कट्टे), स्लॅब व रेलींग इत्यादी चे बांधकाम करणेकामी खालील निविदा दाखल आहेत.

| | |
|---|---|
| 1) सौरभ पांडुरंग पवार | अंदाजपत्रकीय दराने |
| 2) कुलदिप कुंडलिक भिंगारदेवे | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 3%जादा दराने |
| 3) सुहेल सलीम तांबोळी | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 7%जादा दराने |

उपरोक्त निविदापैकी सौरभ पांडुरंग पवार यांचे निविदेतील दर सर्वात कमी आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराची निविदा मंजूर करीत आहे. याकामी रितसर करारपत्र करून कार्यारंभ आदेश देणेत यावा. तसेच नामंजूर टेंडर बयाणा रक्कम अदा करणेस मंजूरी देत आहे.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 12/02/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 239

विषय – स्वच्छ सर्वेक्षण प्रोत्साहनात्मक बक्षिस रक्कम अनुदान मधून नगपरिषद हद्दीतील छत्रपती शिवाजी महाराज चौक या ठिकाणी LED स्क्रीन खरेदी करणे व कार्यान्वित करून देणेकामी GeM Portal वरील दाखल निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी विभाग प्रमुख यांची दिनांक 07/02/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

स्वच्छ सर्वेक्षण प्रोत्साहनात्म बक्षिस रक्कम अनुदान मधून नगपरिषद हद्दीतील छत्रपती शिवाजी महाराज चौक या ठिकाणी LED स्क्रीन खरेदी करणे व कार्यान्वित करून देणेकामी GeM Portal वरील खालील निविदा दाखल आहेत.

| | |
|---|---|
| 1) मे.आय स्मार्ट टेक्नो सोलुशन्स | दर सर्व करासहित र.रू.9,99,970/- |
| 2) मे.श्री.ॲग्रो ॲंड इंजि.सोल्युशन,सांगली | दर सर्व करासहित र.रू.10,70,000/- |
| 3)मे.डायनामिक सोल्युशन | दर सर्व करासहित र.रू.11,40,000/- |

उपरोक्त निविदापैकी मे.आय स्मार्ट टेक्नो सोलुशन्स यांचे निविदेतील दर सर्वात कमी आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराची निविदा मंजूर करीत आहे. याकामी रितसर करारपत्र करून कार्यारंभ आदेश देणेत यावा. तसेच नामंजूर टेंडर बयाणा रक्कम अदा करणेस मंजूरी देत आहे.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 12/02/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 240

विषय – विटा नगरपरिषदेसाठी महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानांतर्गत अग्निशमन वाहन 1 खरेदी करणेकामी GeM Portal वरील दाखल निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी वाहन व्यवस्थापक यांची दिनांक 08/02/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषदेसाठी महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानांतर्गत अग्निशमन वाहन 1 खरेदी करणेकामी GeM Portal वरील खालील निविदा दाखल आहेत.

| | | |
|---|---|---|
| 1) | कॉन्टीप्रो इंडस्ट्रीज, पुणे | र.रू.88,23,640/- |
| 2) | समर्थ एन्टरप्रायजेस, पुणे | र.रू.90,88,096/- |
| 3) | स्मार्ट असोसिएटस, नागपुर | र.रू.91,77,328/- |

उपरोक्त निविदापैकी कॉन्टीप्रो इंडस्ट्रीज, पुणे यांचे निविदेतील दर सर्वात कमी आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराची निविदा मंजूर करीत आहे. याकामी रितसर करारपत्र करून कार्यारंभ आदेश देणेत यावा. तसेच नामंजूर टेंडर बयाणा रक्कम अदा करणेस मंजूरी देत आहे.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा